# स्वरूपसुकन्या



## प. पू. यमुताई कुलकर्णी

सर्वचि ब्रह्म ही ज्ञानाची खूण
तसे आचरण हे भाग्याचे लक्षण ।।
अंतरीच्या अवस्थेचे बाह्य होते प्रकटन्
भेटताचि त्वरित जाणवते खूण ।।
वात्सल्य प्रेम करुणा यांची मूर्त जी
विनय मार्दव यांची परिसीमा जाण ।।
मित रसाळ प्रेमपूर्ण संभाषण
चालणे बोलणे वागणे साधकांसी आदर्श जाण ।।
गुरुप्रेमात रंगलेली स्वरूपाची सुकन्या
वर्णू किती किती अंगीचे त्यांचे गुण!!
गुरुमाऊली यमूताईंच्या एकोणनव्वदाव्या जन्मदिवशी
करुनि त्यांचे स्मरण,
कृष्णदास प्रार्थितो, इच्छितो आशीर्वाद
आमुच्या अंगी सत्वरी बाणो, हे सर्वचि सद्गुण!

******

६ जुलै २०११